# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
## ता.दापोली-४१५७१२ जिल्हा-रत्नागिरी

email id-universityengineerdbskkv@gmail.com

दुरध्वनी क्रमांक : ०२३५८–२८२४११,१२,१३


जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/बांधकाम/अे–७/5496/2778/२०२० दिनांक : 28 SEP 2020

## ई-निविदा सूचना क्र.०२ (सन २०२०-२१)

विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा–रत्नागिरी यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील **स्थापत्य** ठेकेदारांकडून खालील कामासाठी बी–१ नमुन्यामध्ये (व्दि–लखोटा पध्दत) ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा बयाणा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | प्रत्येक ई–निविदा संचाची रक्कम ना परतावा | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत नापणे ता. वैभववाडी जि.सिंधूदूर्ग येथे ऊस संशोधन केंद्र प्रक्षेत्राकरिता चेन लिंक कुंपण तयार करणे. ता.वैभववाडी जि.सिंधूदूर्ग | ५,९८,९८६/— | ६,०००/— | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५००/— | वर्ग ७ |

## ई–निविदेचे वेळापत्रक

| अ. क्र. | डॉ.बा.सा.कोंकण कृषि विद्यापीठाकडील कार्यवाही | कंत्राटदार/ठेकेदाराकडील कार्यवाही | दिनांक व वेळ पासून | दिनांक व वेळ पर्यंत | लखोट्याबाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ई–निविदा प्रसिध्दी | — | ०९.१०.२०२० वेळ १०.०० | — | — |
| २. | — | ई–निविदा डाउनलोड करणे | ०९.१०.२०२० वेळ १०.०० | २३.१०.२०२० वेळ १७.३० | तांत्रिक व आर्थिक लखोटा |
| ३. | — | ई–निविदा तपशिल तयार करणेसाठी कालावधी | ०९.१०.२०२० वेळ १०.०० | २३.१०.२०२० वेळ १७.३० | वरील प्रमाणे |
| ४. | तांत्रिक लखोटा बंद करणे | — | २३.१०.२०२० वेळ १७.३१ | २६.१०.२०२० वेळ १५.०० | वरील प्रमाणे |
| ५. | आर्थिक लखोटा बंद करणे | — | २३.१०.२०२० वेळ १७.३१ | २६.१०.२०२० वेळ १५.०० | वरील प्रमाणे |
| ६. | — | ई–निविदा ऑनलाईन सादर करणे | २६.१०.२०२० वेळ १५.०१ | २८.१०.२०२० वेळ २३.०० | वरील प्रमाणे |
| ७. | तांत्रिक लखोटा उघडणे (शक्य झाल्यास) | — | २९.१०.२०२० वेळ १०.०१ | ०२.११.२०२० वेळ १७.४५ | तांत्रिक लखोटा |
| ८. | आर्थिक लखोटा उघडणे (शक्य झाल्यास) | — | २९.१०.२०२० वेळ १०.०१ | ०२.११.२०२० वेळ १७.४५ | आर्थिक लखोटा |

टिप:
१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या Main Portal- maharashtraetenders.in/adf.maharashtra.etenders.in वर enrolled करणे आवश्यक आहे.
२. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा सादर करणे संदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी Sify Technologies Ltd. Pune दुरध्वनी क्रमांक. ०२०–२५३१५५५५ येथे संपर्क साधावा.
३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.
४. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
५. वरील कामाची सुचना www.dbskkv.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

25/9/2020

विद्यापीठ अभियंता

# <u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>

१. खालील प्रमाणे ठेकेदारांनी ई–निविदेची कागदपत्रे शासकीय संकेतस्थळावर maharashtraetenders.in वर अपलोड करावीत.

१ कोरी ई निविदा विक्री शुल्क ऑनलाईन जमा केल्याची पावती लखोटा क्र.०१ मध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे.

२ इसारा रक्कम ऑनलाईन जमा केल्याची पावती लखोटा क्र.०१ मध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे.

३ सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत बंधनकारक आहे.

४ वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र बंधनकारक

५ ठेकेदाराकडे ई निविदेमध्ये दर्शविलेल्या योग्य त्या कामांसाठी आवश्यक यंत्रसामुग्रीची यादी

६ ठेकेदाराचे नांव/संस्थेचे नांव शासनाचे तसेच अन्य कोणत्याही संस्थेकडे काळया यादीत नसल्याबाबतचे नोटरी समक्ष रु. १००/– मात्रचे कोर्ट फी स्टॅम्प वरील स्वतंत्र शपथपत्र. (निविदा प्रसिध्द् केल्याच्या एक वर्ष आतील कालावधीचे)

७ कामासाठी लागणारी योग्य त्या शैक्षणिक पात्रतेसह तांत्रिक कर्मचारी वर्गाची माहिती.

८ मागील तीन वर्षात पूर्ण केलेल्या व सध्या हाती असलेल्या शासकीय व निमशासकीय कामांची संबधीत शासकीय व निमशासकीय विभागाने दिलेली यादी

९ भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करार व मुखत्यारपत्र यांच्या प्रती

१० महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचा शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र. ०८/इमा–२दि.२८/११/२०१८ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट अ) नोटरी समक्ष अथवा तहसलिदार यांचे समक्ष रक्कम रू. ५००/– रूपयाच्या स्टॅम्प पेपर वर कामाच्या नावाच्या उल्लेखासह केलेले लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

२. **ई निविदा पोर्टलवर निविदा बाबत "बीड लॉक" झाल्यानंतर कंत्राटदारांसाठी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ (बाहात्तर) तासात एका प्रतीत हार्ड कॉपी निम्नस्वाक्षरीकार यांच्या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. ई निविदा प्रक्रियेमध्ये काही अडचण निर्माण झाल्यासच सदर निविदेची हार्ड कॉपी उघडण्यात येईल,याची नोंद घ्यावी.**

३. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांच्या सत्यतेबाबत आवश्यकता भासल्यास प्रत्यक्ष **मुळ कागदपत्रांची** पहाणी करणेत येईल. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांची सत्यता व अन्य तपासणी असमाधानकारक आढळणाऱ्या निविदाधारकांना त्याबाबत कोणत्याही प्रकारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

४. सदर कामाची ई–निविदा फॉर्म फी निविदा फॉर्म डाऊनलोड करणेपूर्वी ऑनलाईन पध्दतीने जमा करावी लागेल. तसेच इसारा रक्कम देखील ऑनलाईन पध्दतीने जमा करावयाची आहे. ठेकेदाराने सर्व रक्कमा या ऑनलाईन पध्दतीने जमा करावयाच्या आहेत. **ई–निविदा फॉर्म फी/इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेमधून कोणत्याही प्रकारची सूट अथवा सवलत मिळणार नाही.** तसेच सदर बाबत कोणत्याही प्रकारची रक्कम ही प्रत्यक्षात विद्यापीठाच्या कोणत्याही खात्यामध्ये बॅकेव्दारे जमा करावयाची नाही. म्हणजेच सर्व व्यवहार हा डेबीट किंवा क्रेडिट कार्ड व्दारेच करावयाचा आहे. बँक कमिशन किंवा बँकेचे इतर चार्जेस वजा जाता या कार्यालयाची निविदेची बयाणा आणि निविदा संचाची किंमत येणे आवश्यक आहे.

५. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीचे मुख्य संकेतस्थळ maharashtraetenders.in किंवा adf.maharashtra.etenders.in येथे नोंदणी करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या ठेकेदारांना ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी **रु. १०९२/–** प्रति निविदा ऑनलाईन जमा करावे लागतील. सदरहू रक्कम ठेकेदाराने ई–निविदा Decryption/Re-encryption करणेचे कालावधीमध्ये ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे.

६. भागीदारी कपंनीच्याबाबतीत निविदा सादर करतेवेळी त्यांना भागीदारीचे करारपत्रासोबत भागीदारांचे फोटो व नोंदणी केलेले भागिदारी प्रमाणपत्राची छायाप्रत जोडणे बंधनकारक आहे. फक्त विषयांकीत कामाकरीता जर भागीदारी संस्था (जॉइन्ट व्हेन्चर) स्थापन करणेत आली असेल व अशी भागीदारी करून आवश्यकत्या नोदणीची अर्हता धारण करण्याचा प्रयत्न केला आहे, असे या कार्यालयाचे तांत्रिक देकार उघडण्यात आल्यावर निदर्शनास आल्यास त्यांचेबाबतीत आर्थिक देकार (लखोटा क्र. २) उघण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

७. रॉयल्टी बाबत ठेकेदाराने निविदा शर्त क्र.३६ प्रमाणे स्वत: कार्यवाही करणेची आहे. या कामासाठी आवश्यक दगड, वाळू, माती व तत्सम गौण खनिजांच्या वापराची एकूण परिमाणे वेळोवेळी होणाऱ्या देयकानुसार तयार करण्यात येवून त्याची होणारी रक्कम ही महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील पत्र क्र. गौखनि १०/०८१२/प्र.क्र. ५३४/ख, दिनांक ०४/१२/२०१२ नुसार सदर कामासाठीची स्वामित्वधनाची रक्कम देयकामधून कपात करण्यात येईल.

८. शासन निर्णय क्र. बीसीए.२००९/प्र.क्र.१०८/कामगार ७–अ, दिनांक १७/६/२०१० अन्वये ईमारत व ईतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ तसेच ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अनुषंगाने ठेकेदाराचे देयकामधून देयकाच्या रक्कमेच्या १ टक्के लेबर सेस वसूल करण्यात येईल.

९. ठेकेदाराने कामावर नेमणेत येणाऱ्या मजूरांचा विमा हा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई यांचेकडून प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यापोटी त्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार बिलामधून विम्यापोटी येणाऱ्या रकमेची वजावट करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१०. ठेकेदाराने शासनाच्या गुणनियंत्रक विभागाने निर्धारित केलेल्या नियमाप्रमाणे कामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याची व कारागीरीची चाचण्या निकष विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे. चाचण्या निकष विद्यापीठास सादर न केल्यास विद्यापीठ शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार स्वत:चाचण्या घेऊन त्याचा होणारा वाहतुकिच्या खर्चासहित चाचण्या न घेतलेल्या एकुण रकमेच्या ( निविदा दराप्रमाणे )पाच पट रक्कम ठेकेदाराचे देयका मधून वजावट करणेत येईल,याची ठेकेदाराने नोंद घ्यावी. किंवा ठेकेदाराच्या देयकामधून वाहतकीच्या खर्चासहित चाचण्या न घेतलेल्या एकुण रकमेच्या ( निविदा दरा प्रमाणे )पाच पट रक्कम वजावट करणेत येईल याची ठेकेदाराने नोंद घ्यावी याबाबत ठेकेदाराला न्यायालयात अपील करता येणार नाही, **विद्यापीठ अभियंता** यांच्या पत्रानुसार ठेकेदाराने शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार चाचण्यांची सुरक्षा रक्कम **विद्यापीठाकडे** जमा केली पाहिजे.

११ खालील निर्देशित केलेल्या शासकीय करांची कंत्राटदाराच्या देयकामधून वेळोवेळी कपात केली जाईल.

a) G.S.T. - शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार जी.एस.टी. कराची टक्केवारी ठेकेदाराचे देयकामधून वजावट करणेत येईल हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

b) Income tax - As per rates fixed by Income Tax Department, Govt. of India

c) Labour Insurance - 0.5 % or 1.00 % will be deducted from the bills

d) Labour cess - 1.0 % will be deducted from the bills.

१२ खालील निर्देशित केलेल्या शासकीय कर कंत्राटदाराच्या देयकामध्ये अधीक केली जाईल.

a) वस्तु व सेवाकर: As per rates fixed by G.S.T.Tax Department, Govt. of India

१३ वरील कामाची सविस्तर ई–निविदा सुचना दिनांक ०९/१०/२०२० पासून विद्यापीठाच्या www.dbskkv.org/ maharashtraetenders.in/adf.maharashtra.etenders.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४ निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

१५ अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात अनुसरण्याच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र.बीडीजी २०१६/प्र.क्र.२/इमा.२ दिनांक १२/०२/२०१६, त्यासंदर्भातील सुधारीत मार्गदर्शक सुचनांबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन शुध्दीपत्रक क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र.२/इमा.२ दिनांक १७/०३/२०१६, त्यासंदर्भातील सुधारीत मार्गदर्शक सुचना सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन शुध्दीपत्रक क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र.२/इमारती–२ दिनांक०१/०४/२०१७ ,त्यासंदर्भातील सुधारीत मार्गदर्शक सुचना सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. बीडीजी२०१६/प्रक. /२/इमारती/२ दिनांक २७/०६/२०१७ तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र क्र ०८/इमा–२ दिनांक २७/०९/२०१८ तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्रक्र.०८/इमा–२ दिनांक २६/११/२०१८ या शासन निर्णयांचे निविदाकारांनी निविदा सादर करतेवेळी पालन करावे.

१६ ज्या निविदाकारांची सादर केलेली कागदपत्रे खोटी आढळुन आल्यास अशा निविदाकारांची इसारा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

१७ **ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात येईल, त्या कंत्राटदारास महसूल व वन विभाग यांच्या दि.०३ जून २०१६ च्या अधिसूचनेमधील अनुच्छेद क्र.६३ मध्ये नमूद केल्यानुसार रू. ५००/– मात्रचे कोर्ट फी स्टॅम्पवर या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा करून द्यावा लागेल.**

१८ इतर अटी व शर्ती ई–निविदा संचामध्ये पहावयास मिळतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

१९ ठेकेदाराने **विद्यापीठ अभियंता** यांनी निर्धारित केलेल्या व विद्यापीठाने कार्यारंभ आदेशामध्ये नमुद केलेल्या रकमेच्या अधीन राहुन काम केले पाहीजे. त्या साठी जर काही कामे रद्द करावी लागली तर ती विना तक्रार ठेकेदाराने रद्द केली पाहीजेत याची ठेकेदाराने नोंद घ्यावी. याबाबत ठेकेदाराला न्यायालयात अपील करता येणार नाही .

२० शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे रहातील.

२१ अधिक माहितीसाठी विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचेकडे कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल.

25/9/2020

**विद्यापीठ अभियंता,**
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण
कृषि विद्यापीठ, दापोली

प्रत, माहितीसाठी सादर :–

१ मा.संशोधन संचालक,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, जि.रत्नागिरी
२ नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
३ कृषिविद्यावेत्ता,कृषी संशोधन केंद्र फोंडाघाट, ता.कणकवली जि.सिंधूदूर्ग
४ मा.कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:–

१ श्री.आर.ए.धनवडे, सहा.अभियंता,दक्षिण बांधकाम उपविभाग, कृषी संशोधन केंद्र, शिरगाव ता.जि.रत्नागिरी
२ श्री.आय.जी.मुल्लाणी,कनिष्ठ अभियंता,उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग
३ प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२/– यांना कळविण्यात येते की, सदरची निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात यावी.
४ नोटीस बोर्ड, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी